# चुलीपल्याड...

अंक ९ वा – मार्च २०१७

**सप्रेम नमस्कार,**

जानेवारी महिन्यात आपलं दोन दिवसांचं निवासी शिबिर रांजे इथल्या अफार्म संस्थेच्या प्रशिक्षण केंद्रात पार पडलं. हवेत सुखद गारवा, संस्थेचा शांत, स्वच्छ परिसर, आपुलकीनं व्यवस्था पहाणारी माणसं आणि शिबिरासाठी आलेले संवादिनीच्या मित्र–संस्थांमधले वेगवेगळ्या वयाचे मित्र–मैत्रिणी, सोप्या आणि सुंदर पध्दतीनं विषयाची मांडणी करणाऱ्या साधनव्यक्ती... सगळंच कसं छान जुळून आलं होतं. गाण्याची मैफिल उत्तरोत्तर रंगत जावी तसा शिबिराला रंग चढत गेला होता.

शिबिराची मध्यवर्ती कल्पना होती ‘सामाजिक समावेशकता: अदृश्यतेकडून दृश्यतेकडे.’ विषयाचा पट मोठा, व्याप्ती मोठी. त्यामध्ये अंतर्भूत सर्व विषयांचा समावेश दोन दिवसांमध्ये करणं शक्य नव्हतं. पण समाविष्ट विषयांबाबतचे गैरसमज दूर व्हावेत, मन–मेंदूतली जळमटं स्वच्छ व्हावीत, नितळ नजरेनं जगाकडे बघता यावं, विविध समाजगटांची, या समुहांची दखल घेतली जावी, स्वीकार व्हावा आणि संविधानानं दिलेल्या मूलभूत हक्कांच्या चौकटीतून, मानवी हक्कांच्या चौकटीतून त्याकडे बघण्याची समज तयार व्हावी हा मुख्य उद्देश होता.

‘आपले किती मित्र, नातेवाईक, शिक्षक, गावचे सरपंच, डॉक्टर, संस्थेतले सहकारी, उच्च पदस्थ अधिकारी हे अपंगत्व असलेले आहेत, इतर जातींचे, दुसऱ्या धर्मांचे आहेत, ट्रांस जेंडर–वेगळी लैंगिकता असणारे आहेत? आहेत का? असले तर ते का आहेत? आणि नसले तर ते का नाहीत आणि मग ते कुठे आहेत’ अशा गाभ्यालाच हात घालणाऱ्या प्रश्नांचे प्रास्ताविक झाले. शिबिराची पायाभरणीच सोप्या वाटणाऱ्या परंतु विचार करायला लावणाऱ्या अशा या प्रश्नांनी केली. संविधानाच्या उद्देशिकेच्या सामूहिक वाचनाने शिबिराचे औपचारिक उदघाटन करण्यात आले.

मेधा कोतवाल लेलेंनी भारतीय संविधानाचं वैशिष्ट्य, मूलभूत हक्क आणि त्यांचं महत्त्व सोदाहरण स्पष्ट केलं. आणि विषयांकडे बघण्याची चौकट अधिक घट्ट आणि नेमकी झाली. अपंगत्व आणि समावेशकता हा विषय समजून घेण्यासाठी मेधा टेंगशे यांची वैचारिक मांडणी, दीक्षा दिंडेचे स्वत:चे अनुभव आणि सत्यमेव जयते कार्यक्रमातला या विषयावरचा भाग खूप मदतकारक ठरला. पूजानं सांगितलेले काळ्या रंगामुळे येणारे भेदाभेदाचे अनुभवही मनाला भिडून गेले. त्यादोघींचे अनुभव या अंकात आहेत. दिशा पिंकी शेख यांनी केलेली बहुलैंगिकतेची मांडणी आणि त्यांचे जगण्याचे अनुभव मनाला चटका लावणारे, डोळ्यात अंजन घालणारे होते. हसिना खान, लता भिसे सोनावणे आणि शैला यादव यांनी समावेशकतेच्या परिप्रेक्ष्यातून मुस्लीम अल्पसंख्याक, जात–व्यवस्था आणि दलित, भटके–विमुक्त यांची स्थिती मांडली. जागेअभावी हे सर्व विचार या अंकात देणं शक्य नाही. म्हणून इथे केवळ नोंद करावी लागत आहे. शिबिराला येऊ न शकलेल्या सर्वांपर्यंत फुलाची केवळ पाकळीच पोचवण्याचा हा प्रयत्न आहे.

आपली,<br>
**वंदना**

**अंतरंग**


| | | |
|---|---|---|
| १. | पण मोडला नाही कणा–अंतरीचा दिवा विझू न देणाऱ्या महिलांचा जीवनप्रवास | २ |
| २. | पावलं पावलं जोडत गेले, रस्ता आपोआप तयार झाला.. | ५ |
| ३. | निवडणूक : एक अनुभव | ७ |
| ४. | रंगभेद : गंभीर सामाजिक भेदभाव | ८ |
| ५. | मी आहे तशीच भारी आहे ! | ९ |
| ६. | ‘सामाजिक समावेशकता:अदृश्यतेकडून दृश्यतेकडे’ सहभागींच्या प्रतिक्रिया | १० |
| ७. | लग्न की बाजार? | १४ |
| ८. | कातकरी मुलांसाठीचं खेळघर | १६ |
| ९. | मुलांना समजून घ्यायला हवं ! | १८ |
| १०. | वाचक लिहितात... | १९ |
| ११. | ‘‘काकू, तू का पेपर वाचतेस?’’ | २० |


# ...पण मोडला नाही कणा
# अंतरीचा दिवा विझू न देणाऱ्या महिलांचा जीवनप्रवास

**मेधा टेंगशे**
साधना व्हिलेज, चिखलवाडी, मुळशी, पौड

प्रिय मैत्रिणींनो,

सप्रेम नमस्कार

कशा आहात तुम्ही सर्वजणी? घरातल्या कुठल्या अडचणींमुळे काळजीत तर नाही ना? गावातल्या निवडणुकांमुळे यंदाही दोन तट पडले का? आपल्या बायाबायांत - बचतगटांतल्या महिलांत त्यामुळे ताण-तणाव आले? आपली मैत्रीण, सोबतीण तुटली, ह्या चिंतेनं मन नाराज आहे का? का, तुम्ही स्वत: नुकत्याच निवडून आलात?




तुमच्यापैकी काहीजणींना मी असे प्रश्न विचारले तर त्या काय म्हणतील माहितीए? 'ताई, आमच्याकडं काही टेन्शन नाही.... सगळं खुशाल आहे.' मी थोडीशी बाजूला झाले की, आपापसात कुजबुजायला लागतील. आपली सुख-दुःखं, अडचणी - मनातल्या काळज्या, नाराजी दबल्या आवाजात सांगतील - खरं आहे ना हे? असंच होतं ना आपल्या कडं?

यात आपला कुणाचा दोष नाही, चूक नाही. कारण तुम्हा-आम्हाला सर्वांना आपल्या घरात, दारात आणि समाजात असंच पहायची लहानपणापासून सवय आहे. 'मान सांगावा जनात आणि अपमान ठेवावा मनात.' हेच ऐकत, शिकत आणि तसंच वागणाऱ्या आई - बहिणी - चुलत्या, आज्या - पणज्या यांना लहानपणापासून बघत आलोय आपण. त्यामुळे अरे ला कारे म्हणायचं नाही, काहीही घडलं आणि आपल्याला पटलं नाही तर 'तसंच का'? म्हणून प्रश्न विचारायचा नाही. खाली मान घालून गप्प तरी बसायचं किंवा पटलं नाही तरी, होकार भरण्यासाठी मान डोलवायची असंच वागावं लागतं ना आपल्याला? घरातली वयानं वडील, नात्यानं जरा लग्नाच्या वळणांवर (म्हणजे सासू-सासरे, थोरले दीर - जाऊ आणि हो, संसार गाड्याची दोन चाकं - म्हणतो आपण, त्यातलं ते दुसरं चाक, पती) भेटलेली घरातली मंडळी आणि गावातली/वस्तीतली पुढारी मंडळी यांच्यापुढं तर चर्चेसाठी, प्रश्न विचारण्यासाठी तोंड उघडायची संधी मिळते का आपल्याला? कधी ती मिळालीच, तर आपण करतो का, मोकळं मन? मांडतो का आपली मतं? इच्छा असते, मनातून बोलायचंही असतं, काही सांगायचंही असतं पण जीभ रेटत नाही. हो ना?

मैत्रिणींनो, म्हणूनच मला तुमच्याशी आपल्या काही मैत्रिणींबद्दल बोलायचंय. तुमच्या-माझ्या सारख्याच, बरंचसं आयुष्य उंबऱ्याच्या आत जगणाऱ्या पण हळूहळू बाहेर डोकावणाऱ्या ह्या मैत्रिणी आहेत ! '...पण मोडला नाही कणा' या पुस्तकामधून त्या आपल्याला भेटतात. संवादिनीच्या नुकत्याच झालेल्या एका शिबिरात या पुस्तकाचं प्रकाशन करण्यात आलं.

मुखपृष्ठावरच्या, वेगवेगळ्या रंगांचे कपडे घातलेल्या चार तरूण मुली हातात हात गुंफून तालात नाचताना पाहिलं ना, की मला वाटलं - ह्या पण गौराईचा खेळ खेळतात की काय!

पुस्तकाच्या '..पण मोडला नाही कणा' या नावावरून तर, संकटं आली, पण हार पत्करली नाही! अशा महिलांच्या कहाण्या असणार असा अदमास बांधला.

ह्या जीवनकहाण्या खऱ्याखुऱ्या आहेत, त्या त्या बाईच्या बाबतीत प्रत्यक्ष घडलेल्या आहेत! आता बघा ना, साधं शाळेत जाण्याची गोष्ट ती काय! पण साधनाच्या फुलाबाई लोयरेंना काय करावं लागलं? तर, तीन दिवस झाडावर जाऊन बसावं लागलं. वडिलांनी एकदाचं "बाई, जा शाळेत, ये खाली आणि घे खाऊन" असं म्हटल्यावरच बाई खाली उतरल्या आणि झाली की, त्यांची शाळा सुरू !

लग्नाच्या बाबतीत तर प्रत्येकीची कहाणी वेगळी. रचना संस्थेच्या मंगलताई मांजरे म्हणतात, "मला कोणी विचारलंसुद्धा नाही की, मुलगा पसंत आहे का? मला लवकर लग्न करायची इच्छा नव्हती – वेगळं काही करावं असे वाटायचं." पण नाही जमलं करायला म्हणून मंगलताई तिथंच अडून राहिल्या नाहीत. 'डाव आपल्या मनासारखा पडला नाही, म्हणून डाव मोडायचा कशाला?' असा विचार केला, आपली वाट शोधली आणि रचना संस्थेच्या प्रशिक्षणानं, साथीनं गावकारभारात लक्ष घालायला लागल्या. निवडून आल्यानंतर आपल्या अधिकाराचा योग्य वापर करून, आपल्या कार्यकाळात ग्रामपंचायतीमार्फत आपल्या गावातली शाळा, स्मशानभूमी चांगल्या पद्धतीनं कशी बांधली जाईल याची काळजी घेतली.

आपण काळासोबत बदलत गेलो, आपल्या आवडीनिवडीत फरक करत गेलो, उंबऱ्याबाहेरचं आभाळ शोधत गेलो की, आपली वाट पुढं जाते. त्यात आपली जडणघडण होते. दुसऱ्यांनाही हातभार लागतो. क्रांतिज्योती संस्थेच्या अनिता जैनजांगडेंचंच बघा ना. त्या म्हणतात, "सुरुवातीला इथे (संस्थेत) काही वाचायला दिलं तरी झोप यायची. सरांनी मला छोटी, छोटी पुस्तकं वाचायला दिली, ती वाचून यायची मग ते त्याबद्दल विचारत गेले. मग विचार येऊ लागला की, काहीच माहीत नव्हतं आपल्याला; वाचणं किती गरजेचं आहे. वाचल्याशिवाय काही कळत नाही. आता रात्री अकराच्या नंतर जरी वेळ भेटला तरी मी वाचते. रोज थोडंतरी वाचायचंच." मला फार आवडला अनितातार्इंचा हा विचार! बघा, माणूस कुठून कुठे जातो! दाखवूनच लग्न झालेल्या अनितातार्इ आपल्या मुलीच्या लग्नाबाबत काय म्हणतात, माहितेय? 'मुलीच्या लग्नाचं तर



पुस्तक-प्रकाशन कार्यक्रमात डावीकडून शमिम मडकी, फुलाबाई लोयरे, वंदना कुलकर्णी, दिशा शेख, लता भिसे सोनावणे, शैला यादव

एवढं ठेवलंय की, तिनं एकतरी डिग्री घ्यायची. लव्हमॅरेज केलं तरी चालेल. जातीचं पण काही नाहीय – मुलालाही तसंच सांगितलंय.'

मैत्रिणींनो, ही सगळी वाचनाची किमया तर आहेच पण वाचलेलं नुस्तं प्रवचनासारखं तिथल्या तिथं सोडायचं नाही. आपल्या मनात, विचारात मुरवायचं, जगण्याला जोडायचं. त्यानुसार आपल्या मनाला, वागण्याला बदलवत निर्णय घ्यायचे असा हा प्रवास आहे.

तसंच अपघातानं असेल, गरजेपोटी असेल सामाजिक संस्थांमध्ये ह्या महिला काम करायला लागल्या. आपल्याला पटलेल्या निर्णयासाठी त्या ठामपणे उभ्या राहिल्या – घरातल्यांचा, गावातल्यांचा अगदी भावकीतल्या लोकांचाही विरोध पत्करून! कधी खचल्या, नाराज झाल्या, एकाकी पडल्या, चार पावलं मागं आल्या पण नेटानं पुढं चालत राहिल्या – मनातला विचाराचा, विवेकाचा दिवा विझू न देता !

त्यांना प्रश्न पडले तसे प्रश्न तुम्हाआम्हा सर्वांनाच पडतात. पण आपण ते दाबून टाकतो. पण त्यांनी ते स्वत:ला विचारले, घरातल्यांना विचारले आणि समाजाला – गावातल्यांना विचारले. शाळेत जाण्याची संधी न मिळालेल्या साधनाच्या धडाडीच्या कार्यकर्त्या शाहुबाई कांबळे आपल्या कहाणीत म्हणतात, ''मी गावच्या लोकांना विचारलं, आम्ही जवळून जाऊ नये म्हणून रस्ता दिला नाही मग आता आमचं पाणी कसं चालतं? देवळाला इटाळ होतो म्हणून रस्ता देत नाही मग आमच्या पाण्याचा त्येंना कसा इटाळ होत नाही?''

प्रश्न पडणं – तसा तो धाडसानं संबंधितांना विचारणं, त्याचा पाठपुरावा करून तो सोडवणं असे अनेक प्रयत्न ह्या महिलांनी केले. निर्माण संस्थेच्या तरूण कार्यकर्त्या शैला यादव ह्यांची तर कोल्हाटी समाजातल्या महिलांसाठीची लढाई फारच धाडसाची ! ती आपण मुळातूनच वाचायला हवी. तसंच बुरखा घालायचं बंद करणाऱ्या क्रांतिज्योतीच्या शमिमताई मडकी – प्रपंच्याच्या गाडीचं एक चाक दारूत बुडालेलं असताना, हिमतीनं संस्थेच्या कार्यात हातभार लावणाऱ्या रचनाच्या अनिताताई दिवेकर यांच्या कहाण्या प्रेरक आहेत.

गरीब कुटुंबांना अडचणीत आणणाऱ्या पाचवी, टिळे ह्या प्रथा आपल्या गावात बंद करणाऱ्या कांताबाई येवले डिजेचाही आवाज बंद करतात तेव्हा खूपच आनंद झाला. दिशा संस्थेच्या वयानं मोठ्या असलेल्या ह्या ताई जुन्या चालीरीतींकडं नव्या नजरेनं बघतात. ह्याचं खूप समाधान वाटतं आणि स्वतःच्या नाजूक तब्येतीसह आयुष्यातल्या अनेक अडचणींना तोंड देणाऱ्या पण सेंद्रिय शेतीसारख्या विधायक कामात गोडी घेणाऱ्या नवनिर्माण न्यासाच्या संगीताताई ताकवणेंचं कौतुक वाटतं. कार्यकर्त्या असलेल्या संगीताताई आपल्या शेतीच्या निर्णयात पुढारीपणा करतात, इतरांना मार्गदर्शन करतात – तेव्हा इतर ग्रामीण महिलांना उदाहरण घालून देतात.

मैत्रिणींनो, ह्या पुस्तकातले सुरुवातीचे दोन लेख वाचायलाच हवेत. वंदना कुलकर्णींनी हे पुस्तक काढण्यामागची भूमिका सांगितलीय आणि ह्या महिला कार्यकर्त्यांचे जीवन आपल्या भारतीय समाजाच्या इतिहासात का महत्त्वाचे आहे हे लताताई भिसे सोनावणे यांनी अभ्यासपूर्वक पण सोप्या भाषेत मांडलंय.

मला वाटतं, प्रत्येकीनं हे पुस्तक तर वाचावंच पण आपल्या गटात, संस्थेच्या बैठकीत गटा-गटानं वाचावं, त्यावर चर्चा करावी, त्या महिलांच्या जीवनाशी आपलं जीवन ताडून बघावं आणि आपल्या घरातले, उंबऱ्याबाहेरचे निर्णय अधिक जाणतेपणानं घ्यावेत. ज्यांना शक्य आहे, त्यांनी आपल्याला ज्यांच्या कहाण्या आवडल्या, पटल्या, खटकल्या त्याबद्दल त्या, त्या ताईंशी फोनवरून थेट संपर्क साधावा – त्यांच्याशी मैत्री करावी. तुम्हाला काय वाटतं?

आपल्याच वाटेवरून चालणाऱ्या पण आपल्याहून चार पावलं पुढं असणाऱ्या ह्या महिला मला कशा वाटतात सांगू? आपल्यासाठी, तुमच्या – माझ्यासाठी हातात दिवे घेऊन वाट दाखवणाऱ्या. आपल्यासारख्याच, पण तरीही थोडं अधिक पाहिलेल्या आणि थोडं वेगळं जीवन जगलेल्या !

म्हणूनच म्हणते – आत्तापुरते आपण एक करू या का? आपण हे पुस्तक वाचू या आणि इतरांना वाचण्याची शिफारस करू या. जगण्याचा आनंद घेऊ या आणि जगणे समृद्ध करू या.

खूप शुभेच्छांसह,

तुमची,
मेधाताई


# पावलं पावलं जोडत गेले, रस्ता आपोआप तयार झाला..

**दीक्षा दिंडे**, पुणे

लहानपणापासून आजूबाजूची परिस्थिती पाहून, मनात समाजसेवेची आवड निर्माण होत गेली. घरच्यांनी केलेली जडणघडण, त्यातून मिळालेली योग्य दिशा आणि शिक्षक व मित्र-मैत्रिणींची मिळालेली साथ, यामुळे आज हातून हे थोडे फार काम घडत आहे. मी काही समाजसेवक नाही, भासणाऱ्या प्रश्नांची उत्तरे शोधणारी व्यक्ती आहे. हातून घडत असणारी सेवाही एक माझं कर्तव्यच आहे, समाजाचे ऋण फेडण्याचं. रोज कोणाला तरी हसवण्याचं, लोकांच्या आयुष्यातला अंध:कार दूर करून प्रकाश पेरण्याचं कर्तव्य.

मी जन्मत: शारीरिकदृष्ट्या ८४% अपंग आहे. घरची परिस्थितीही बेताचीच आहे. माझी आई टेलर आहे. बाबांचं नुकतंच निधन झालं. अनेक अडचणींवर मात करत आईनं माझं शिक्षण पूर्ण केलं. ॲडमिशनसाठी मला मिळणारा नकार असो वा अपंग मूल असल्यानं हितचिंतकांकडून ऐकून घ्याव्या लागणाऱ्या गोष्टी असोत वा घरच्या जबाबदाऱ्या असोत सर्व ती यथोचित पार पाडत आलेली आहे. मी कॉमर्स पदवीधर असून, आता एमए करत आहे. आपली उद्दिष्टे व आवड एकच असते तेव्हा सगळं काही मनासारखं घडून येत असतं, असं मला वाटतं.

'तुम्ही अपंग आहात' ही सातत्यानं करून दिली जाणारी जाणीवच मुळी तुमची समाजातून स्वत:ची ओळख नाहीशी करून टाकते. विशिष्ट घटकात मोडणं वा इतरांपेक्षा वेगळं दिसणं म्हणजे जणू काही पापच, एक गुन्हाच. त्यामुळे सर्वसाधारण समाज अशा वेगळ्या घटकाला नाकारू लागतो. पण खरं तर ह्या व्यक्ती ती प्रत्येक गोष्ट करू शकतात जी एखादी साधारण व्यक्ती करू शकते, तीही वेगळ्या पद्धतीनं.



सुदैवानं मला चांगले आई-वडील, शिक्षक व मित्र-मैत्रिणी मिळाले म्हणून मी स्वत:ला सिद्ध करू शकले. लोकांच्या वागण्यामुळे किंवा स्वत:च्या असमर्थतेमुळे बरेचदा आत्महत्येचे विचार मनात यायचे, अथवा आपण नसतोच जन्मलो तर किती बरं झालं असतं असे विचारही मनात आले. शाळा-कॉलेजमध्ये सहसा जास्त रमले नाही मी. कारण ते जग बंदिस्त होतं माझ्यासाठी. आपल्या सोयीनुसार लोक येऊन भेटायचे, मला त्यांच्यापर्यंत जाता येत नव्हतं. त्यांच्यासारखं फिरता येत नव्हतं. काही जवळचे नातेवाईकही मला कधी त्यांच्याकडे बोलवत नसतं, माझी जबाबदारी त्यांना घ्यायला लागू नये या दृष्टिकोनातून. इतर ठिकाणी हालचाल करते वेळी उपलब्ध पायाभूत सुविधांच्या अभावामुळे, फिरणं तर कधी आयुष्यात माहिती नव्हतं मला. त्यामुळे मी स्वत:चं वजनही वाढू दिलं नाही, जेणेकरून आपण कोणाला ओझं होणार नाही. एकप्रकारची भीती होती मनात. या ठरावीक काळापर्यंत मी नकारात्मक विचारच करायचे. स्वत:वर माझा थोडासुद्धा विश्वास नव्हता. आईनं साथ दिली नसती, विश्वास दाखवला नसता तर आज मी इथपर्यंत पोहोचूच शकले नसते.

२०१२-१३ मध्ये घरातल्या एका कार्यक्रमादरम्यान अनाथाश्रमातल्या काही मुलांना भेटले आणि आपल्याला नक्की

काय करायचं आहे त्याची दिशा मिळाली. त्याचवेळी मी चाणक्य मंडलमध्ये स्पर्धा – परीक्षेची तयारी करत होते. याच काळात असे काही लोक भेटले ज्यांनी माझं अस्तित्त्व स्वीकारलं. मी खुलत गेले. मीसुद्धा एक माणूस आहे, याची जाणीव या काळात भेटलेल्या मित्रमैत्रिणींनी मला करून दिली. माझ्याकडे काय नाही यापेक्षा काय आहे त्याकडे मी पाहू लागले, जग आपोआप सुंदर बनत गेलं. त्यातूनच आजच्या कामाचा पाया रोवला गेला. त्यानंतर रोशनी संस्थेच्या संपर्कात आले व वंचित मुलांच्या शिक्षणासाठीचं काम सुरू झालं. काम होतं, स्नेहालय, नगर यांच्या कात्रजमधल्या शारदा बालभवन या प्रकल्पातल्या मुलांसाठी कृति–आधारित मुक्त शिक्षणाची संकल्पना राबविणं. संस्कारवर्ग, खेळ, गोष्टी, नृत्य, वाचन, स्पर्धा या विविध गोष्टींच्या माध्यमातून मुलांमध्ये संस्कार रुजवण्याचं काम मला दोन वर्ष करता आलं.

त्याचवेळी मी नेहरू युवा केंद्र या संघटनेशीही जोडले गेले. नेहरू युवा कार्यकर्ता म्हणून काम करू लागले. नेहरू युवा हे युवक व क्रीडा मंत्रालयानं, ग्रामीण युवकांना राष्ट्र निर्माण प्रक्रियेत सहभागी करून घेण्याच्या व युवकांमध्ये कौशल्यविकास करण्याच्या उद्देशानं स्थापन केलेलं केंद्र आहे.

हळूहळू कामाचा विस्तारही वाढत गेला. अपंगांचे हक्क, महिला सक्षमीकरण, मासिक पाळीतळी स्वच्छता, या विषयांवर काम करू लागले. आयुष्यात मला ज्या समस्यांना तोंड द्यावं लागलं किंवा मी जे अनुभवलं ते या कथित विशिष्ट गटाला सहन करावं लागू नये ही त्या मागची तळमळ होती. ह्या लोकांना त्यांच्या हक्काचं स्वातंत्र्य मिळावं, समाजानं त्यांना आपलंसं करावं, सर्वसमावेशकता ही संकल्पना खऱ्या अर्थानं रुजावी यासाठीचे माझे प्रयत्न आता थांबणार नाहीयेत. खूप मेहनतीनं स्वत:ची ओळख मी निर्माण करू शकलेय.

आलोचनाची मी खूप आभारी आहे की त्यांनी मला पहिल्यांदा अशा विषयावर बोलण्याची संधी दिली. लोकांची मानसिकता सुधारण्याचं खूप चांगलं काम आलोचना करत आहे. हसीनाताईसोबत बोलतानाही या शिबिरात या विषयाचे अजून कंगोरे उलगडत गेले. त्यांच्यामुळे मला कळलं की, माझ्यासारख्या मुलीनं प्रेम–लग्न करणं काहीही गुन्हा नाहीये, आनंदानं जगायचा अधिकार तर सगळ्यांनाच आहे. एक सांगायचं म्हणजे, पाल्य (विशेषत: मुलगी) जर अपंग असेल तर तिच्याशी तिच्या भविष्याबाबतच्या चर्चा आजही घरोघरी सहसा होताना दिसत नाहीत. अशा व्यक्तीची जबाबदारी कोण, कशी घेणार ही त्यामागची भूमिका असते. बरेचदा माणसाकडे माणूस म्हणून पाहत नाही समाज.

आता जे काही थोडं फार हातून घडलंय. त्याचीच दखल संयुक्त राष्ट्रसंघाच्या 'अ वर्ल्ड ऍट स्कुल' या शिक्षणासाठी काम करणाऱ्या संस्थेनं घेतली आणि माझी भारतीय शिक्षण राजदूत म्हणून नेमणूक केली.

यापुढेही मला पाय जमिनीवर ठेवून, निस्वार्थी भावनेनं काम करायचं आहे. कारण मिळत असलेलं यश हे काही फक्त माझं नाही. लोकांसाठी काम करायचं असेल तर सर्व समाजाला एकत्रित बांधून ठेवावं लागेल. प्रशासनात गेल्यावर गाठीशी असणारा हा अनुभव नक्कीच उपयोगी पडेल यात तीळमात्रही शंका नाही.

(संवादिनी–निवासी शिबिरात दीक्षाने केलेली मांडणी)

## हा छंद जिवाला लावी पिसे...

वाचन हे फक्त परीक्षेत प्रश्नांची उत्तरे लिहिण्यासाठी करायचे इतकाच माझ्यासाठी वाचनाचा उद्देश होता. मागील अठरा वर्षात सामाजिक कार्यकर्ता म्हणून वेगवेगळ्या संस्थांमध्ये काम करीत असताना कामासाठी लागणारी माहिती म्हणून मी वाचन करत होतो. परंतु गेल्या चार–पाच वर्षात आलोचनाच्या संवादिनी प्रकल्पातील पुस्तकपेटीमुळे पुस्तके सहज उपलब्ध व्हायला लागली. पुस्तके उपलब्ध होतायत म्हणून वाचन सुरू केले. आणि त्याचे व्यसन केव्हा लागले कळलेच नाही. केव्हा एकदा नवीन पुस्तक हातात पडते आहे आणि कधी मी ते वाचून पूर्ण करतोय अशी स्पर्धा मी माझ्याच मनाशी करतो आहे. माझे वाचन वाढले, वाचनामुळे मी स्वतःला शोधू लागलो. यामध्ये मला माझ्यातील वाचक तर सापडलाच परंतु एक लेखकसुद्धा सापडला.

– **संतोष वंजारी**, दिशा, तळेगाव दाभाडे

# निवडणूक : एक अनुभव

**अर्चना जगताप,**
क्विल्ट कल्चर, कोंढवा, पुणे

२०१७ हे वर्ष माझ्यासाठी जणू अनुभवांचा खजिनाच झालाय. महानगरपालिकेच्या निवडणुका, प्रचार, रॅली, सभा हे सर्व दुरून नाही तर प्रत्यक्ष सहभाग घेऊन अनुभवता आले. प्रभागातील विविध आर्थिक, सामाजिक व राजकीय पातळ्यांवरच्या लोकांच्या भेटीगाठी झाल्या. समाजातील विविध स्तरातल्या समस्यांना समजून घेता आले. प्रभागातल्या राजकारण्यांवर असलेला रोष आणि प्रेम दोन्हींचा अनुभव आला. विशेषत: कमी आर्थिक स्तरातील कुटुंबातील आदरातिथ्य भारावून टाकणारे होते. त्यात कुठेही औपचारिकतेच्या सीमारेषा नव्हत्या. सारेच नवीन उत्साह आणि जिवंतपणाची जाणीव करून देणारे वातावरण होते. यात खूप साऱ्या नव्या मैत्रिणी भेटल्या.

पाणी, रस्ता, पथदिवे यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर लोक जेव्हा राग व्यक्त करत, तेव्हा शांतपणे 'म्हणूनच तर परिवर्तन हवे आहे' म्हणत सर्वांना सामोरे जात होतो. काही भागात प्रचार करताना फार निर्धास्त वाटत होते. तर काही ठिकाणी वेगळ्या सांस्कृतिक वातावरणामुळे फारच गुदमरल्यासारखे वाटायचे. कधी प्रश्नांना उत्तरे देता-देता दमछाक व्हायची. धावपळ, ऊन, घोषणा चालून - चालून पायाचे तुकडे पडतील अशी अवस्था. रात्री उशिरा झोपणे आणि दुसऱ्या दिवशी पुन्हा लवकर उठून कामाला लागणे... कितीतरी दिवस असा दिनक्रम चालू होता.

शेवटी २१ फेब्रुवारीचा दिवस उजाडला. हा दिवस गावासाठी अनेक घडामोडींनी भरलेला होता. महिनाभर एका पक्षाच्या उमेदवारासाठी फिरणारे रात्रीतून दुसऱ्याने निवडून यावे म्हणून पैसे वाटपाचे काम करत होते. साधारण एकच्या सुमारास बोगस मतदानासाठी आलेल्या बऱ्याच गाड्या पकडल्या गेल्या होत्या. सकाळी आठ वाजल्यापासूनच एका पक्षाचे बोगस मतदानाचे काम सुरू होते. खऱ्या मतदाराने मतदान करण्यापूर्वीच त्यांच्या नावावर कोणीतरी मतदान करून गेलेले होते. वर्षानुवर्षे मतदान करणाऱ्या व्यक्तींची नावेच मतदार यादीत नव्हती. ज्या व्यक्तीला १००-२०० मते पडणे मुश्किल होते अशी व्यक्ती कितीतरी हजारांच्या मताधिक्याने निवडून आली. निकाल जाहीर झाला तेव्हा आनंद साजरा करायलादेखील काही विजेत्यांकडे चार टाळकी नव्हती. आणि ज्यांनी प्रभागाच्या विकासासाठी काम केले, प्रश्नांना सोडविण्याचा प्रयत्न केला त्यांना मात्र इतकी कमी मते पडली की लोकांना तो आश्चर्याचा मोठाच धक्का होता.

एकीकडे मतदान करा म्हणून लोकांना आव्हान केले जातेय. तर दुसरीकडे बोगस मतदान, एव्हीएममशीनचे सेटींग अशा लोकशाहीला काळिमा फासणाऱ्या घटना घडताहेत. वरील घटनांमुळे लोकशाहीचा अर्थच बदलतो आहे. ही आपली हुकूमशाहीकडे होणारी वाटचाल तर नाही ना?

अशा घटनांना वेळीच आळा बसला पाहिजे. यासाठी योग्य उपाययोजना असाव्यात. आपल्या नावावर कोणीतरी व्यक्ती मतदान करून गेली असेल तर पोलिसांशी संपर्क साधावा. पोलीस व तेथील अधिकाऱ्यांनीदेखील घटनेचे गांभीर्य ओळखून दक्ष रहावे. देशातील सर्वात मोठ्या लोकशाहीच्या उत्सवाला अशा प्रकारे गालबोट लागणे म्हणजे लोकशाहीचा अपमान आहे.

# रंगभेद : गंभीर सामाजिक भेदभाव

**पूजा मानखेडकर**, पुणे

मी सहा वर्षांची होईपर्यंत सर्वकाही ठीकठाक होते. मी अतिशय आनंदी व बडबडी मुलगी होते... पण त्यानंतर मला असे अनुभव येत गेले की ज्यामुळे माझा स्वाभिमान दुखावला गेला, माझा आत्मविश्वास ढासळला आणि मी सर्व लोकांपासून दूर – स्वत:च्या कोषात जाऊ लागले. होय, हे मला माझ्या रंगामुळे आलेल्या भेदभावाचे अनुभव होते. केवळ माझा रंग हा मला इतरांपेक्षा कमी लेखण्याचे कारण असू शकते हे मला पहिल्यांदा कळत होते.

याचा परिणाम म्हणजे माझा अभ्यासातील रस संपला व शाळेतील विविध गोष्टींमध्ये सहभाग घेण्याचे मी थांबवले. माझी शाळेत जायची इच्छाच मेली. येता–जाता ऐकावे लागणारे टोमणे सहन करायची ताकदच माझ्यात राहिली नाही.

कहर म्हणजे माझे शिक्षकसुद्धा माझ्याशी भेदभावाने वागत. एक शिक्षक तर मला 'निग्रो' नावाने हाक मारत.. निग्रो ही अफ्रिकेतील लोकांना (जे रंगाने काळे असतात) संबोधण्याची चुकीची अवमानकारक पद्धत आहे. मला अशी हाक मारण्यामुळे माझ्या भारतीय असण्याबद्दलही शंका घेतली जात होती; मला हे सगळं खूप त्रासदायक होत होतं.

या सगळ्याचा परिणाम म्हणजे माझे शाळेतील गैरहजेरीचे प्रमाण वाढत गेले. पण कोणत्याही शिक्षकाने तुला काही अडचण आहे का अशी साधी विचारपूस कधी केली नाही. मानसिकदृष्ट्या माझी फार केविलवाणी अवस्था झाली होती. माझ्यात खूप काही कमतरता आहे आणि ती भरून काढण्याचा कोणताही उपाय माझ्याकडे नाही. असे मला सतत वाटत होते.

पण मी या सगळयातून बाहेर येऊ शकले आणि याला कारण माझ्या पालकांनी दिलेला आधार व प्रोत्साहन आणि योग्य मार्गदर्शन. यामुळेच निराशेच्या गर्तेतून बाहेर पडून मी अभ्यासावर लक्ष केंद्रित करू शकले व त्यामुळे शिक्षणाचे महत्त्व मला जास्तच पटले.

अशा प्रकारे केवळ पालकांच्या पाठिंब्यामुळे मी स्वत:ला सावरू शकले. पण मला माहिती आहे की, असे समजूतदार पालक सर्वांनाच मिळत नाहीत कारण अनेकदा त्यांच्यावरही समाजाच्या सौंदर्याच्या कल्पनांचा जबरदस्त पगडा असतो. मुलांना मात्र प्रत्येक पावलावर थट्टा सहन करावी लागते. ती ऐकतच मोठी झालेली ही मुले आयुष्यभर हा न्यूनगंड घेऊनच जगतात.

कोणत्याही व्यक्तीच्या रंगरूपावरून तिची किंमत करणे हे मुळातच चूक आहे. आणि असा भेदभाव करणे हा कायद्याने नसला तरी सामाजिक गुन्हाच आहे.

पुढच्या पिढीतील कोणालाही असे भेदभावाचे अनुभव घ्यावे लागू नयेत म्हणून त्यांच्याशी याबाबत संवाद साधणे गरजेचे आहे असे मला वाटते. म्हणूनच मी माझ्या कलरब्रेव्ह या चळवळीच्या माध्यमातून शाळा–शाळांमध्ये जाऊन असा भेदभाव न करण्याविषयी जनजागृती करते. आश्चर्याची व खेदाचीही गोष्ट अशी की, अनेकजण विशेषत: मुली मला येऊन भेटतात व त्यांना आलेल्या भेदभावाच्या अनुभवाबद्दल सांगतात.

अशा वेळी मी त्यांना एकच सांगते की, तुमचे रूप ही एक नैसर्गिक देणगी आहे. तुम्ही जसे आहात तसे सुंदरच आहात.. स्वत:ला आहे तसे स्वीकारा. जगाच्या सौंदर्याच्या मोजपट्ट्या स्वत:ला लावू नका. आत्मविश्वासाने जगा.

(संवादिनी निवासी शिबिरात पूजाने केलेली मांडणी)

# मी आहे तशीच भारी आहे !

**आरती जगताप,**
क्विल्ट कल्चर, कोंढवा, पुणे

कितीही नाही म्हणाले तरी मनाला सावळ्या रंगाची खंत वाटतेच. आपल्याकडे जरी रंगभेद उघडपणे केला जात नसला तरी अप्रत्यक्षरित्या तो जाणवतोच अन् अशी एक नाही दोन नाही तरी कित्येक उदाहरणं जीवनात अनुभवली आहेत.

शाळेत असताना कधी या गोष्टीचा फारसा विचार केला नव्हता परंतु शाळेतही रंगभेद केला जातो. आठवीत असताना शालेय वार्षिक स्नेहसंमेलनात एका नाचामध्ये भाग घेतला होता आणि माझी नृत्यकला कितीही चांगली असली तरी सावळ्या रंगामुळे मला दुसऱ्या क्रमांकावर ठेवण्यात आलं होतं.

आजकाल अगदी कोणालाही सुंदर या विषयाची व्याख्या विचारली तर 'गोरा रंग' यालाच प्राधान्य दिलं जाताना दिसतं. प्रत्येक मुलीला वाटतं की तिनं सुंदर दिसावं. हळूहळू मोठी होत गेल्यावर माझ्यातली ही गोरं होण्याची क्रेझ वाढतच गेली.

व्यक्तीच्या स्वभावापेक्षा तिच्या दिसण्याला जास्त महत्त्व दिलं जातं असं मला नेहमी वाटायचं. अन आजही कधी कधी मनात येतंच की थोडी गोरी असते तर खूप बरं झालं असतं.

कधी कधी तर असं वाटतं की 'कलर गेला की पैसा परत' ही म्हण अगदी माझ्यासारख्या मुलींसाठीच बनवली आहे. वेस्ट इंडीज, काळी मैना, ब्लॅक डायमंड... अशी एक नाही तर अनेक नावं मला मिळाली.

बारावी पास झाले अन अगदी तेव्हापासूनच मला लग्नासाठी स्थळं पाहण्याची सुरुवात झाली. गेली सात वर्षं हा शोध सुरूच आहे. आलेल्या पाहुण्यांकडून नेहमी एकच उत्तर ऐकायला मिळाले की मुलगी नाकीडोळी छान आहे पण खूपच काळी आहे. नेहमी नेहमी हीच उत्तरं ऐकून दिवसेंदिवस माझ्यातला आत्मविश्वास कमी होत गेला.

मला नेहमी दिसतं. मुलगा कमी शिकलेला असला. चांगल्या नोकरीला नसला तरी गोरी बायको हवी हाच अट्टहास असतो. एकदा तर सहज बोलता बोलता एकजण माझ्या आईला म्हणाली, ''एवढी काळी मुलगी कशी बाई जन्माला घातलीस?'' हे शब्द मी आजवर विसरू शकले नाही. घरी, बाहेर, पाहुण्यांमध्ये, नोकरीच्या ठिकाणी रंगावरून केल्या जाणाऱ्या थट्टामस्करीमुळे माझ्यातली मी दिवसेंदिवस हरवत गेले होते.

२०१३ मधे मी टि.बी.एस.एस. कंपनीमध्ये कस्टमर केअर एक्झ्युक्युटीव्ह म्हणून कामाला लागले. आणि वर्षभरातच पहिलं प्रमोशन मिळालं. तिथे दोन वर्षं काम केल्यानंतर दुसऱ्या प्रमोशनची तयारी केली त्यासाठी इंटरनॅशनल कस्टमर सर्विसला जायचं होतं. परीक्षेला जाण्यापूर्वी माझ्या काही सिनीयर लोकांनी मला सांगितलं होतं की इंटरनॅशनल लेव्हलला व्यक्तीच्या कामासोबत त्याच्या दिसण्यालाही प्राधान्य दिलं जातं. जाताना स्कार्फ बांधून जा, गेल्यावर अगोदर फ्रेश हो, पावडर लाव, केस चांगले कर... अशा बऱ्याच गोष्टी सांगितल्या गेल्या. तिथे माझी निवड क्वालिटी स्पेशालिस्ट म्हणून झाली त्यावेळीही मला जाणवलं की खरंच चांगल्या गुणांसोबत आकर्षक चेहराही तितकाच महत्त्वाचा आहे.

यावर्षीच्या आलोचनाच्या शिबिरात समावेशकता या विषयावर संपूर्ण चर्चा करण्यात आली. त्यात पूजाने मांडलेला रंगभेदाचा विषय तर मला फारच आवडला. तो ऐकून खूप वर्षांनंतर माझ्यातला आत्मविश्वास पुन्हा वाढला. तिथे मेधाताईंनी मला खूप समजावले की रंग जरी सावळा असला तरी तू खूप सुंदर आहेस. ज्या मुलांनी तुझ्यातले गुण न पाहता केवळ सावळ्या रंगामुळे तुला नाकारलं असेल त्यांनी खरंच खूपच चांगली व्यक्ती गमावलीय.

मागच्या आठवड्यात मी कॅपीटा या इंटरनॅशनल कंपनीच्या पुरस्कार कार्यक्रमामध्ये सूत्रसंचालकाची महत्त्वाची भूमिका सांभाळली. मला पुन्हा वाटलं की माणसाच्या दिसण्यापेक्षा खरंच त्याच्यातल्या गुणांना वाव मिळायला हवा.

पूर्वी मी लोकांची बोलणी ऐकून बाहेर जाणं, लग्नसमारंभात जाणं अशा बऱ्याच गोष्टी टाळत होते पण आता मला असं करण्याची गरजच वाटत नाही. मी जशी आहे तशीच खूप भारी आहे आणि खरंच माझ्यासारखं दुसरं कोणी नाही.

# ‘सामाजिक समावेशकता : अदृश्यतेकडून दृश्यतेकडे’ सहभागींच्या प्रतिक्रिया

## ...आणि आमचा दृष्टिकोनच बदलला !

आलोचना संस्थेच्या दोन दिवसांच्या शिबिरामध्ये सहभागी होण्याची संधी मला मिळाली. सामाजिक समावेशकता हा शिबिराचा विषय होता. या विषयावर दिवसभर सत्र चालू होते. सत्र संपल्यावर संध्याकाळच्या वेळेस आम्ही सगळे जेवण करून हॉलमध्ये आलो. आम्हाला ताईंनी सांगितले होते की दिवसभर आपण काय काय शिकलो त्याच्यावर प्रेझेंटेशन करायचं आहे. आम्ही सगळे त्याच्यामध्ये मग्न होतो. तर अचानक ‘दिशाचा’ प्रवेश झाला. माझी मुलगी खुशी तिला पाहताच लगेच माझ्याकडे आली आणि मला विचारू लागली, ‘‘मम्मी, हा माणूस कोण आहे? कशाला आला आहे? मला भीती वाटते त्यांची.’’ पण मी तिच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केलं. कारण मलाच काय, कसं सांगू कळत नव्हतं. कारण मला फक्त माहिती होतं की हे तृतीयपंथी



दिशा पिंकी शेख : प्रश्नोत्तरांच्या कार्यक्रमात

लोक पैसे मागायला येतात. मलाही त्यांची खूप भीती वाटायची. पण मी गप्प बसले. मला काही समजेना. सगळेजण लगेच चर्चा करू लागले. एकमेकांना विचारू लागले. पण तेवढ्यात लगेच तिने आमच्यासमोर बसून कविता बोलायला सुरुवात केली.

ती कविता बोलत होती आणि त्या कवितेचा अर्थ मनाला भिडत होता. नंतर तिने सांगितले की मी स्वत: ह्या कविता लिहिलेल्या आहेत. तिने अशा चार, पाच कविता ऐकविल्या. त्याच वेळेस माझा तिच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला. किती छान कविता केल्या होत्या तिने !

तिचे अर्धवट स्त्रीत्व
त्याच्या चौकटीत बसत नाही म्हणून
तिला प्रवाहातून बाहेर उभे केले
सहस्त्रवधी वर्षापासून...

अशी खूप छान कविता होती. लगेच दिशाचे जीवनचरित्र ऐकण्याची इच्छा माझ्या मनात निर्माण झाली.

दुसऱ्या दिवशीचे सकाळचे पहिले सत्र दिशाचेच होते. दिशाची ओळख करून देण्यात आली.

दिशा पिंकी शेख – राहणार – श्रीरामपूर, अहमदनगर. तिचा १८० लोकांचा परिवार आहे.

दिशाने तृतीयपंथी कशा प्रकारे असतात त्याबद्दल खूप चांगल्या प्रकारे माहिती सांगितली.

हा माझ्या जीवनामधला हृदयस्पर्शी अनुभव होता.

माझ्या जीवनामध्ये जेव्हा जेव्हा मी तृतीयपंथी व्यक्तींना बघितले होते तेव्हा माझ्या मनामध्ये खूप भीती होती. पण तृतीयपंथी असे का राहतात, असे का वागतात व पैसे का

मागतात हा प्रश्न मला नेहमी पडत असे.

कधीही कुठेही ते पैसे मागायला आले तर त्यांना मी घाबरून पैसे द्यायची. कारण अशी विचारधारणा समाजामध्ये रुजवली आहे की त्यांना पैसे नाही दिले तर त्यांचा शाप लागतो. पण असे काही नसून ही एक अंधश्रद्धा आहे असे आम्हाला दिशाने पटवून दिले.

तृतीयपंथींची मयत रात्रीच्या वेळेस नेतात. आणि ती मयत दिसली तर खूप भाग्यवान मानले जाते. समाजामध्ये असा समज रूजण्याचे कारण आम्हाला समजले. ते हे की गावामध्ये वेगवेगळ्या जातीची घरे असायची त्यामध्ये तृतीयपंथीचे घर एखादे असायचे. प्रत्येक जाती- धर्माच्या वेगवेगळ्या स्मशानभूमी असायच्या. पण तृतीयपंथींना स्मशानभूमी दिली जात नसे. त्यांना कुठेही स्थान दिले जात नसे. म्हणून तृतीयपंथी रात्रीची मयत नेत असत. तेही शेतामध्ये एका विशिष्ट ठिकाणी उभा खड्डा खोदून (दफन) पुरले जात असे.

आलोचनाने आयोजित केलेल्या या शिबिरामुळे दिशाची ओळख झाली आणि त्यांच्या जीवनाबद्दल माहिती मिळाली. त्यांच्या जीवनात येणाऱ्या समस्या आणि घडामोडी तिने आमच्या समोर सविस्तर मांडल्या. त्यामुळे माझा तृतीयपंथीयांकडे पाहण्याचा दृष्टिकोन पूर्ण बदलला.

तृतीयपंथी लोकांविषयी असणाऱ्या समजुती आमच्या मनातून काढून दिशाने एक प्रकारे आम्हाला दिशा देण्याचे काम केले.

दिशा पूर्णपणे आमच्यात मिसळून गेली. सर्वांशी एक घट्ट मैत्री झाली. खुशी हे सगळे पाहत होती. आदल्या दिवशी दिशाला पाहून खुशी घाबरून गेली होती. दिशा जायला निघाली तेव्हा मी खुशीला तिच्यासमोर घेऊन गेले. दिशाने लगेच खुशीचा हातात हात घेतला. तिला मिठी मारली. यामुळे खुशीच्या मनातील तृतीयपंथी लोकांविषयी असणारी भीती दूर झाली, खूप लहान वयात तिला या गोष्टी समजल्या व समाजात असणाऱ्या, काही गैरसमजुती तिला थोड्या प्रमाणात का होईना समजल्या आहेत. यामुळे मला खात्री आहे की भविष्यात ती इतर गोष्टींना लगेच समजू शकेल.

**गौरी सोनवणे,**
क्रांतिज्योती, येरवडा, पुणे

## आदर्श नागरिक होण्याची प्रेरणा मिळाली

आपल्याला सांगायला आनंद होतो की नवीन वर्ष सुरू झालं आणि माझ्या आयुष्याला एक नवं वळण मिळायला सुरुवात झाली. मला एवढ्या लहान वयामध्ये एवढ्या चांगल्या गोष्टी शिकायला मिळाल्या आहेत. मी खूप भाग्यवान आहे असं मला वाटतं कारण आलोचना संस्थेच्या दोन दिवसांच्या शिबिरामध्ये मला सहभागी होता आलं . खरं सांगायचं म्हटलं तर मी या ठिकाणी जाण्यासाठी तयार नव्हतो. कारण मला वाटत होतं की आत्ताशी कुठे मी बारावी होतो आहे. या ठिकाणी सर्व नामांकित व्यक्ती, वेगवेगळ्या संस्थेतले वयानं, अनुभवानं मोठे असणारे लोक येणार, या ठिकाणी जाऊन मी काय करणार असा प्रश्न माझ्या मनात येत होता. पण मग मी ठरवलं, मनाची तयारी करायची आणि जायचं. मी स्वारगेटला पोचलो आणि त्या ठिकाणी मला खूप सारे लोक भेटले. मग आम्ही प्रवासाला सुरुवात केली आणि थोड्याच वेळात आम्ही कोंढणपूर या ठिकाणी पोहचलो.

सर्वांत प्रथम आम्हाला प्रत्येकाला एक एक चिठ्ठी दिली. त्या चिठ्ठीत वेगवेगळ्या प्रकारची नावं होती. उदा. शाळा, बाजार. त्यामध्ये गाव ही चिठ्ठी मला आली होती. ती चिठ्ठी अजून पाच जणांनाही मिळाली होती. या गटानं कृतीतून गटाचं नाव व्यक्त करायचं होतं. आणि बाकीच्या मंडळींनी ते ओळखायचं होतं. ते सादर करत असताना मला माझ्या शाळेची आठवण आली. कारण आमच्या शाळेत मी नाटक, डान्स यात भाग घ्यायचो.

खरं शिकायला मिळालं ते म्हणजे आपण आपल्या जीवनात सर्व व्यक्तींना समान हक्क देतो का? माझ्या आयुष्यात या नव्या विचाराची नव्यानं भर पडली. त्यातलीच एक गोष्ट सांगायची म्हटलं तर तृतीयपंथींकडे मी आता त्याही सर्वसामान्य व्यक्तीसारख्या आहेत या दृष्टीनं पाहत आहे. खरं सांगायचं म्हटलं तर मला आधी खूप भीती वाटायची; कारण माझा दृष्टिकोन समाजातल्या लोकांनी वाईट करून टाकला होता आणि ते मला समजलं नव्हतं. पण त्या ठिकाणी दिशा शेख या तृतीयपंथी व्यक्तीनं त्यांची, त्यांच्या समाजाची हकिकत

सांगितल्यावर माझी खात्री पटली आणि मी आता सांगू शकतो की माझ्या आदर्श व्यक्तींमधली एक व्यक्ती ही एक तृतीयपंथी आहे. आणि त्यांच्याकडून मला खूप काही नवीन गोष्टी शिकायला मिळाल्या आहेत.

आपण अपंग व्यक्तीकडे कोणत्या भावनेनं पाहतो? अपंग व्यक्तीकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन वाईट आहे. ते कसं चुकीचं आहे, हे मला कळलं. त्यांना प्रोत्साहन दिलं पाहिजे, त्यांना आपण सर्व क्षेत्रांमध्ये संधी दिली पाहिजे, पुढे आणलं पाहिजे. त्यासाठी त्यांच्याकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन बदलला पाहिजे. तेव्हाच आपण हे सर्व घडवू शकतो.

खरं सांगायचं तर मला नव्यानं काही गोष्टी शिकायला मिळाल्या आहेत. मला इथे एक आदर्श नागरिक म्हणून जगण्यासाठी प्रेरणा मिळाली. अशा प्रकारच्या शिबिरातून आपण माझ्यासारख्या मुलांना वेगळ्या प्रकारे घडवू शकता. यातून नक्कीच चांगली मुलं घडतील असं मला वाटतं.

मला या शिबिरामध्ये बरंच काही शिकायला मिळालं आहे. माझ्या आयुष्याला नवं वळण मिळालं. आदर्श नागरिक होण्याचा निश्चय मी या शिबिरामधून केला आहे.

माझ्या सारख्या अनेक मुलांना अशा गोष्टी शिकायच्या आहेत परंतु परिस्थितीमुळे ते शिकता येत नाही. तुमच्या प्रयत्नानं माझ्या सारख्या अनेक मुलांना अशा गोष्टी शिकायला मिळतील अशी आशा बाळगतो व पुढील वाटचालीबद्दल तुम्हाला शुभेच्छा देतो !

**प्रसाद साळुंके,**
सावित्रीबाई फुले वाचनालय, धायरी



शिबिरातल्या रंगलेल्या गटचर्चा

## समज वाढली, गैरसमज दूर झाले

मी प्रथमच आलोचना संस्थेच्या शिबिरामध्ये निर्माण संस्थेच्या वतीने सहभागी झालो होतो. मला आलोचना संस्थेबद्दल जास्त काही माहिती नव्हती, पण त्यांच्या एकदिवसीय बैठकीत मी सहभागी झालो होतो. या बैठकीमध्ये समाजातील जातीव्यवस्था व त्याची नियंत्रणे यावर सर्व सहभागी मित्र-मैत्रिणींनी चर्चा केली. ही माझी आलोचना संस्थेची पहिली ओळख.

नंतर मी या दोन दिवसाच्या शिबिरात सहभागी झालो. या शिबिरामधील समजलेले मुद्दे –

१) मी आपले संविधान एवढे निरखून कधीच पाहिले अथवा वाचले नाही ज्यावेळी वंदनाताई संविधान वाचत होत्या त्यावेळी त्या एक-एक शब्दामध्ये किती मोठा अर्थ दडलेला आहे, हे मला समजून आले तसेच आपले मित्र, नातेवाईक, शेजारी, कामाच्या ठिकाणी यामध्ये इतरधर्मीय लोक दिसत नाहीत हे प्रामुख्याने जाणवले. आपणच जर या गोष्टी मानल्या तर, त्या सोडवणार कोण? हा प्रश्न माझ्या मनामध्ये उपस्थित झाला.

२) अपंग लोकांबद्दल माहिती सांगितली तेव्हा काही गोष्टींची माहिती नव्याने मिळाली, अपंग हे आपल्या समाजाचा एक घटक असून त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन आपण बदलला पाहिजे. भारतामध्ये अपंग लोकांसाठी जास्तीच्या सुविधा नाहीत आणि जरी असल्या तरी त्यांची अंमलबजावणी नीट होताना दिसत नाही. शिबिरादरम्यान दाखवलेल्या सत्यमेव जयते हा अपंगत्वाशी संबंधित एपिसोड खूपच छान वाटला, तर तितकेच दुःख झाले की त्यांच्यासाठी प्रभावी योजना आपल्या भारतामध्ये नाहीत, सहसा एखाद्याला त्याच्या व्यंगावरून/अपंगत्वावरून चिडवले जाते. ते चुकीचे आहे.
मला वाटते की आपण अशा लोकांना आपल्यामध्ये मिसळून घेतले पाहिजे. त्या गोष्टींचा आनंद होऊ दिला पाहिजे, तर कुठे आपल्यातील माणुसकी जिवंत आहे. असे मला वाटेल.

३) तसेच शिबिरामध्ये रंगभेद हा नवीन विषय मला समजला. तर मी ह्या प्रश्नाकडे सामाजिक समस्या म्हणून कधीच

पाहिले नाही, पण ज्यावेळी शिबिरामध्ये पूजाने तिच्या आयुष्यामधील अनुभव सांगितले त्यावेळी या समस्येकडे मी एक सामाजिक समस्या म्हणून बघू लागलो. खरेतर आपल्या आजूबाजूला आपण स्वत:च कितीतरी लोकांना त्यांच्या दिसण्यावरून चिडवत असतो, पण ज्याला आपण



असे काही बोलतो त्याला त्याची लाज वाटते व त्याच्या मनात नकारात्मक भावना तयार होतात, किंबहुना त्या व्यक्तिची पीछेहाट होते. घरामध्ये दोन मुली असतील तर त्यातील एक गोरी व एक काळी असेल तर बोलताना काळ्या/सावळ्या रंगाच्या मुलींना जास्त बोलले जाते. या गोष्टीकडे बघण्याचा माझा दृष्टिकोन बदलला आहे.

४) दुसऱ्या सत्रामध्ये दिशाताईंनी भारतामधील तृतीयपंथी समाजाची परिस्थिती सांगण्यास सुरुवात केली. मला या गोष्टीबद्दल थोडीफार माहिती होती. पण त्यांचे प्रश्न इतके ज्वलंत असतील असे मला वाटले नाही. दिशाताईंच्या कविता हृदय हेलावून टाकणाऱ्या होत्या. त्यांच्या कवितेच्या प्रत्येक पंक्तीतून एक संदेश येत होता की, आम्ही सुद्धा माणसे आहोत, आम्हाला तुमची सहानुभूती नको सहानुभाव पाहिजे आहे.

शहरामधून प्रवास करताना कित्येकदा मला तृतीयपंथी लोक दिसून येतात, पण मला वाटत होते की हे लोक दुसऱ्यांना लुबाडण्यासाठीच असतात. पण या वेळेस कळून चुकले की आपणच त्यांना या गोष्टी करण्यास भाग पाडत आहोत. तृतीयपंथीयांची एकच मागणी समाजाकडून होती आणि ती म्हणजे माणुसकी, आम्ही माणसे आहोत. आणि आम्हाला माणसांप्रमाणे जगू द्या आम्हाला माणूस म्हणून वागवा.

५) आमच्या निर्माण संस्थेच्या शैला यादव यांनी भटके विमुक्त लोकांची परिस्थिती सांगितली. पूर्वी गावां-गावांमध्ये भटकून आपले पोट भरण्याचा प्रयत्न हा भटके-विमुक्त समाज करत होता, मुले-मुली तारेवरची कसरत, कोलांट उड्या मारून दाखवत व एक कोणीतरी जमलेल्या लोकांकडून अन्नधान्य जमा करत असे. अशा पद्धतीने भटके-विमुक्त कोल्हाटी - डोंबारी समाजाचा परिचय होता.

हा समाज भटकत राहायचा म्हणून त्यांच्याजवळ स्थावर मालमत्ता नव्हती.

यासर्वांकडे भटकंतीमुळे आजही भारतीय नागरिकत्वाचे पुरावे नाहीत तसेच हा समाज पूर्णपणे वंचित राहिलेला समाज आहे.

६) मुस्लीम समाजाची स्थिती याविषयी हसिना खान यांनी खूप छान पद्धतीने माहिती सांगितली. आधी मनामध्ये मुस्लीम हा शब्द आला की ते वेगळे आहेत असे वाटायचे, मनामध्ये बिंबवलेली ती छबी होती. ती बदलायला मदत झाली.

असे अनेक सामाजिक मुद्दे मला आलोचना संस्थेच्या शिबिरामध्ये समजून आले.

**अक्षय बुगडे**
निर्माण संस्था, पुणे

# लग्न की बाजार?

**रुपाली मडके**
साधना व्हिलेज, चिखलगाव, मुळशी, पौड

लग्न, जोडीदार या प्रत्येकाच्याच आयुष्यातल्या महत्त्वाच्या घटना. प्रत्येक स्त्री-पुरुष चांगल्या वाईट गोष्टी असतात. त्यातही एकमेकांना पूरक ठरवत संसाराचा डोलारा उभा करायचा असतो. क्षणिक राग, खोटा अहंकार, हुंडा अशा बऱ्याच काही गोष्टींसाठी स्त्रियांचा छळ होतो. पण लग्नसंस्थेवर विश्वास ठेवत चालत आलेल्या वाईट प्रथा आणि परंपरांचा एक संस्कार म्हणून स्वीकार करत आपण त्या जपत असतो. फक्त लोक काय म्हणतील या भीतीपोटी.

एम.एस.डब्ल्यु.च्या शेवटच्या वर्षाची परीक्षा अगदी जवळ आलेली होती. माझं संपूर्ण लक्ष अभ्यासात गुंतलेलं होतं. आणि एक दिवस अचानक मामांचा फोन आला. त्यांनी माझ्या वडिलांना सांगितलं की, रूपालीसाठी एक स्थळ आहे. मुलगा मुख्याध्यापक आहे. सरकारी नोकरी आहे. चांगला पगार आहे वगैरे; पसंत पडलं सर्व तर लग्न करून टाकूया. घरच्यांनीही असं ठरवून टाकलं. लग्न माझं होणार होतं पण यामध्ये माझ्या परवानगीची आवश्यकताही घरच्यांना वाटली नाही. मला आत्ताच लग्न करायचं आहे किंवा नाही? माझी लग्न करण्याची मानसिक तयारी आहे की नाही? शिक्षण झाल्यावर लग्न करून मोकळं व्हायचं की नोकरी करायची? या सर्व गोष्टी कोणालाही महत्त्वाच्या वाटल्या नाहीत. कोणीही हा विचार करत नव्हतं. आणि तेव्हाच सर्वांनी मुलगा बघायला येण्याची तारीख ठरवूनही टाकली. मी विनवणी करत होते की, निदान परीक्षा तरी होऊ द्या. नंतर मुलगा वगैरे बघा. तेव्हा 'नोकरीवाली मुलं काय रस्त्यावर पडलेली असतात काय, सरकारी नोकरीवाली मुलं काय रस्त्यावर पडलेली असतात का? अशी मुलं शोधून मिळणार नाहीत' ..असं मलाच रागवून सांगण्यात आलं. मी गप्प बसले. मला प्रकर्षानं जाणीव झाली की, इथे माझ्याच आयुष्यातला लग्नासारखा महत्त्वाचा निर्णय घेण्याचं स्वातंत्र्य मला नाही. लग्न, कधी करायचं आणि कधी नाही, कुठला मुलगा आपल्यासाठी योग्य आहे हे सर्व घरातले लोक आणि नातेवाईक ठरवणार होते.

ठरल्याप्रमाणे मुलगा बघायला आला. परंपरेनुसार ज्या गोष्टींना आपण संस्कार मानून आजपर्यंत जपत आलेलो आहोत तेच सोंग मला तेव्हा करावं लागलं. साडी घालता येईना तरीसुद्धा साडीच घातली पाहिजे! असं केलं नाही आणि सरळ त्यांच्यापुढे जाऊन बसलं तर लोक काय म्हणतील अशी मलाही भीती वाटली. आणि इच्छा नसताना आणि मनापासून हे सर्व आवडत नसताना घरच्यांसाठी ते सर्व करावं लागलं.

त्यानंतर मुलाकडून पसंती आली. सर्वांना खूप आनंद झाला. पण मला खूप रडायला आलं. एका क्षणांत माझं स्वातंत्र्य आणि आयुष्यच हिरावून घेतल्यासारखं मला वाटलं. तेव्हा सर्वांनी फक्त मुलाच्याच पसंतीचा विचार केला. पण मला मुलगा आवडला की नाही असं कोणीही विचारलं नाही. माझ्या आवडीला विचारातच घेतलं गेलं नाही.

सर्वांना मुलाची नोकरीच आवडली होती. असं वाटत होतं की, माझं त्या मुलाच्या नोकरीशीच लग्न होणारय की काय? मला मुलगा आवडला नव्हता, मला लगेच लग्नही करायचं नव्हतं. परंतु घरातल्या लोकांच्या आग्रहासाठी मी लग्नाला तयार झाले.

माझी परीक्षा संपल्यानंतर लग्नाची तारीख घेतली आणि त्यावेळी मुलानं हुंड्याची मागणी केली. साडेपाच तोळ्याचा गोफ आणि अंगठी मागितली आणि लग्नसुद्धा लवकर करायचं, त्यांनी ठरवलेल्या तारखेलाच! मुलगा सरकारी नोकरीवर आहे म्हणून माझ्या घरचे लोकं त्याच्या मागण्या पूर्ण करायला तयार झाले. म्हणजेच हुंडा द्यायला तयार झाले. मला हे सर्व अजिबात मान्य नव्हतं. मी खूप अस्वस्थ झाले. मी विचार करू लागले की एवढे उच्चशिक्षित असूनसुद्धा हुंड्यासारख्या गोष्टीला हे लोक मान्यता का देतात. मी घरच्यांना विनवण्या करत होती की मला

एकदा त्या मुलाशी बोलू तरी द्या. परंतु त्यांनी काहीही ऐकलं नाही. मला खूप संताप आलेला होता. मी संतापून म्हणाले, ''काहीही होऊ दे मी या मुलाशी लग्न करणार नाही.'' कारण जे काही चाललेलं होतं ते मला अजिबात न पटणारं होतं. सर्वजण मला समजावण्याचा प्रयत्न करत होते की, मुलगा आवडला असं तू सर्वांसमोर म्हणायचं. एकप्रकारे माझ्यावर दबावच होता सर्वांचा. मी कुठलाही विचार न करता सरळ उत्तर दिलं की हा मुलगा मला पसंत नाही आणि मी याच्याशी लग्न करणार नाही. हे ऐकल्यावर सर्वांना धक्काच बसला. सर्वजण मला रागवायला लागले, ''सरकारी नोकरीवाल्या मुलाला तू नकार दिलास. तुला काही कळतं की नाही?'' मी म्हणाले, ''कळतं म्हणूनच मी नकार दिला. फक्त त्या मुलाच्या नोकरीकडे बघून तुम्ही सर्वकाही त्या मुलाच्या म्हणण्याप्रमाणे करावं हे मला योग्य वाटत नाही. हुंडासुद्धा द्यायला तयार झालात. त्या मुलाला तर नोकरी आहे आणि तरीही तो हुंडा मागतोय? भीक लागली का त्या भिकारड्याला?'' असं बरंच काही मी संतापून म्हणाले, ''हुंडा देणं आणि घेणं कायद्यानं गुन्हा आहे हे त्याला माहीत नाही का? नसेल माहीत तर त्याला माहीत करून द्यावा आणि तुम्हीसुद्धा माहिती करून घ्या.'' ''जास्त शिकली म्हणून हुशार झालीस का?'' असं म्हणायला लागले.

शिक्षक असूनसुद्धा हा हुंडा मागतोय. काय अर्थ आहे ह्याच्या शिक्षकी पेशाला आणि माणुसकीला? काय आदर्श ठेवणार हा विद्यार्थ्यांपुढे? की त्यांना पण हेच शिकवणार की, मी तर विकलं स्वत:ला हुंडा घेऊन तुम्हीपण विका स्वत:ला, बैल विकत मिळतात तसे. असे प्रसंग अनेक मुलींच्या जीवनात आले असतील आणि अजूनही येत असतीलच. हुंड्यामुळे मुलींचा छळ होतो. कितीतरी मुली हुंड्यापायी बळी गेलेल्या आहे. हुंडा मिळाला नाही तर लग्नं मोडली जातात. तरीही समाज हा मुलींनाच दोषी ठरवतो. उच्चशिक्षित लोक हुंड्यासारख्या गोष्टीला पाठिंबा देतात. यावरून असं वाटतं की फक्त राहणीमानानं मॉडर्न होऊन चालत नाही तर विचारामध्ये सुद्धा मॉडर्ननेस असायला पाहिजे. फक्त जिन्सपॅन्ट, टी शर्ट घातल्याने मॉड होता येत नाही. हुंड्यासारख्या गोष्टीला आपण तरूण लोकांनीच विरोध केला पाहिजे.

अजूनही मुलींना जोडीदार निवडण्याचं स्वातंत्र्य नाही. जर कुठला मुलगा आपल्या मुलीला बघत असेल तर घरातल्या लोकांना, आई-वडिलांना ते अजिबात आवडत नाही. पण अशाच उपवर मुलीला दाखविण्याचा कार्यक्रम घरी ठरवून मुलीला दाखविलं जातं हे सर्वांना आवडतं. ते कोणालाही खटकत नाही. एकदा बघून मुलगी चांगली की वाईट हे ते बघायला येणारे लोक ठरवतात. मुलीला नापसंत करतात तेव्हा त्या मुलीच्या मनावर काय परिणाम होत असतील याची कोणालाही जाणीव नसते त्यामुळे मुलींच्या मनात कमीपणाची भावना निर्माण होऊन आत्मविश्वास कमी होतो आणि वरून हुंडासुद्धा मागितला जातो. हुंड्यामुळे अनेकांचे संसार उद्ध्वस्त झालेले आहेत आणि होत आहेत. हे असले प्रकार आपण तरूणांनीच जाणीवपूर्वक थांबवायला पाहिजेत.

## हळदी कुंकू नव्हे तिळगूळ समारंभ

जानेवारी महिना नवीन वर्षाची सुरवात, त्यानंतर लगेच आपला आवडता सण-मकरसंक्रांत. या महिन्यात महिला-बचत गटाच्या बैठकांमध्ये रंगलेली चर्चा म्हणजे हळदीकुंकू समारंभ. गटातल्या महिला एकत्र येतात, वस्तू आणतात, समारंभात महिलांना वाटतात. पण यावर्षी आम्ही ठरवलं की हळदीकुंकू न करता तिळगूळ समारंभ करायचा. इंदोरीतल्या दिशा आणि पूर्वा गटानं मिळून कार्यक्रम घेतला. यामध्ये मुस्लीम महिलांचा चांगला सहभाग होता. नोटाबंदीमुळे बायकांना नवीन खातं उघडायला, गटाचं खातं उघडायला बँक सहकार्य करत नव्हती. म्हणून या कार्यक्रमासाठी मुद्दाम बँक-अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी बोलावलं होतं. या कार्यक्रमानंतर मात्र बँकेचं व्यवस्थित सहकार्य मिळायला लागलं. दुसरा कार्यक्रम झाला तळेगावातल्या तळ्याकाठच्या भागात. इथल्या गटांबरोबर गेल्या वर्षी वर्षभर संवादिनीच्या बैठका झाल्या होत्या. इथंही हिंदू, मुस्लीम स्त्रिया सहभागी झाल्या होत्या तशा विधवा आणि पाळी चालू असणाऱ्या स्त्रियाही तिळगुळ समारंभाला उपस्थित होत्या. हळदीकुंकू समारंभ म्हटलं असतं तर त्या आल्या असत्या का? 'आपली कृती जाती-धर्मात, बायका-बायकात केले जाणारे भेदाभेद मिटवणारी असायला हवी' बैठकीत वेगवेगळ्या वेळी मांडले गेलेले हे विचार असे छोट्या प्रमाणात का होईना प्रत्यक्षात उतरले होते.

अपर्णा कुलकर्णी, दिशा, तळेगाव दाभाडे

# कातकरी मुलांसाठीचं खेळघर

**शांतीसागर संगीता – विजयकुमार कांबळे**
नारी समता मंच, पुणे

नारी समता मंच ही संस्था गेली पस्तीस वर्षं स्त्री–पुरुष समतेसाठी काम करत आहे. स्त्री हक्कांसाठी काम करत असतानाच परिघाबाहेर रहाणाऱ्या आदिवासी, कातकरी समाजासाठीही मंच काम करत आहे. या कामाची सुरवात भीमाशंकरजवळच्या आंबेगाव या आदिवासी भागातल्या कामानं झाली. जगण्यासाठी महत्त्वाच्या अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य ह्या मूलभूत बाबींची असणारी अनिश्चितता आणि जगण्याच्या संघर्षात होणारी होरपळ हे आदिवासींचं वास्तव जवळून पाहता आलं. कधी दारू–भट्टीवर, कधी वीट–भट्टीवर काम, कधी मासेमारी तर कधी शेतमजुरी अशी हंगामी कामं करणं हे त्यांच्या जगण्याचं साधन होतं. राजकारणी लोकांनी आदिवासी–कातकरी समाजाचा फक्त मतांसाठीच वापर केला. 'मतदान करता येणे आणि इतर कोणतेही सरकारी ओळखपुरावे / कागदपत्रे नसणे ही केवढी विसंगती आहे !'

२००१ च्या सुरुवातीला, मंचानं कातकऱ्यांबरोबर काम करायला सुरुवात केली. कातकरी समाजाचा अभ्यास करणं आणि त्यांना नागरिकत्वाचे पुरावे मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणं असा कार्यक्रम ठरवला. पहिल्या टप्प्यात कातकरी लोकांचं अंत्योदय योजनेचं रेशनकार्ड काढलं. सतत दोन वर्षं कायदेशीर लढाई करून, काही जणांना जातीचे दाखले मिळवून दिले. कातकरी समाजाला हक्क, कल्याणकारी योजना मिळण्याचे दरवाजे जरासे उघडले. मात्र कागदपत्रं मिळाली म्हणजे विकास झाला असं होत नाही. प्रौढ लोकांसोबत काम करताना या मर्यादा जाणवत होत्या. त्यामुळे पुढच्या पिढीवर लक्ष दिलं तर बदल होऊ शकेल, शिक्षणाची शिदोरी मुलांपर्यंत पोहोचली तर काही स्थैर्य मिळू शकते या विचारातून शिक्षणाचं कार्यक्षेत्र निश्चित झालं. मुळशी तालुक्यात ह्या कामाला सुरुवात झाली.

कातकरी मुलामुलींना शाळेची, शिक्षणाची गोडी लावायची असेल तर काहीतरी नवीन करावं लागेल हे समजलं. यासाठी कोणाची तरी मदत घ्यावी लागणार होती. पुण्यामध्ये वंचित मुलांसाठी पालकनीती परिवाराची खेळघरं चालतात. पालकनीती परिवार खेळघर प्रेरकांना प्रशिक्षण देईल आणि मंच प्रत्यक्ष अंमलबजावणी करेल अशी कामाची रूपरेषा ठरली आणि २००७ मधे मुळशी तालुक्यात मोहोळनगर, कोंढूर, आंदगाव, लव्हार्डे, कळमशेत, आन्देशे, बेलावडे, ताम्हिणी आणि दावडी अशा नऊ ठिकाणी खेळघरं सुरू झाली. सुरुवातीला ही खेळघरं कातकरी वस्तीवरच चालत असत. वस्तीवरच राहणारे आणि मोठ्या

> आता मुलांनी शाळेची वाट धरली होती. पण या प्रवासादरम्यान कातकरी बोली भाषा व मराठी भाषा यात तसं अंतरच होतं. कारण घरी कातकरी बोली व शाळेत मराठी भाषा आणि त्यात कातकरी भाषेला लिपीच नाही अशी स्थिती. म्हणून मंचानं एक वेगळा प्रयोग करून बघायचं ठरवलं. कातकरी समाजाच्या पारंपरिक कथा, गाणी, म्हणी (कातकरी भाषेत म्हणीला हुकीना असं म्हणतात) ह्या देवनागरीत जतन करायच्या. इतर बोली भाषेसारखी कातकरी बोली भाषा लुप्त होऊ नये, जुन्या गोष्टी व गाणी व इतर गोष्टींचा त्यांच्याच भाषेत संग्रह व्हावा हा उद्देश. सलग दोन तीन वर्षं माहिती संकलनाचं काम केलं. आणि त्यातून २००९ साली नारी समता मंचाचं कातकरी भाषेतलं पुस्तक प्रकाशित झालं. त्याचं नाव 'माझ्या भाषेतील गोष्टी'. आज जेव्हा मुलं हे पुस्तक वाचतात तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर स्वत:च्या भाषेचं प्रेम आणि आपुलकी दिसते.

इयत्तेत शिकणारे ताई दादा मुलांना शिकवत, त्यांचे खेळ घेत. अशा प्रकारे त्यांचं शिक्षण, त्यांच्याच वस्तीत विविध पद्धतीनं सुरू झालं. सहा वर्षानंतर म्हणजेच २०१४-१५ साली चौथीचे पाच विद्यार्थी दहावीपर्यंत पोचले. मुळशी तालुक्यात राहणाऱ्या कातकऱ्यांपैकी खेळघरात येणारी आणि दहावीत गेलेली ही पहिलीच बॅच. सर्वांसाठीच हा क्षण आनंदाचा होता, कारण मागील सत्तर वर्षात कातकरी समाजाचा आणि शिक्षणाचा फारसा संबंधच आलेला नव्हता. अंधश्रद्धा, गरिबी, बालविवाह, व्यसनं या गोष्टी आडव्या येत होत्या. पण मागील सात वर्षात परिस्थिती थोडीशी बदलली. दहावीला बसलेल्या पाच विद्यार्थ्यांमधल्या तीन मुली होत्या. बोर्डाची परीक्षा झाली, निकाल लागला आणि खेळघराचे हे पाचही विद्यार्थी चांगल्या मार्कांनी पास झाले. मग काय कातकरी पद्धतीनुसार, त्यांची गावातून ढोल-ताशा वाजवत मिरवणूक काढली. पुढच्याच वर्षी २०१५-१६ साली, बेलावडे येथील कातकरी वस्तीत राहणारा अक्षय कोळी हा मुलगा ८७% मिळवून दहावीला शाळेत पहिला आला. किती आनंदाची गोष्ट होती ही ! गरिबीमुळे घरी नीट खायला मिळत नाही, रात्रीचा अभ्यास करायला दिवा नाही. बाहेर काम केल्याशिवाय रात्री जेवायला नाही अशी परिस्थिती असताना अक्षय शाळेत पहिला आला.




या दहा वर्षाच्या काळात व्होल्कार्ट फौंडेशन आणि अनेक संवेदनशील देणगीदार व्यक्तींमुळे खेळघरं स्थिरावली. २०१४-१५ पासून टेक महिंद्रा फौंडेशनचा खेळघरांना भक्कम पाठिंबा मिळाला आहे. आता कातकरी मुलं-मुली दहावीच्या पुढचं शिक्षणही घेऊ लागली आहेत. काही मुलं -मुली पुण्यात कामाला लागलीत. त्यामुळे गावा-वस्तीतल्या इतर मुलांनाही प्रेरणा मिळते आहे. त्यामुळे शाळागळतीचं प्रमाणही कमी झालेलं आहे. आता प्रत्येक खेळघरात गावातली शिक्षित महिला शिकवते. खेळघर तायांची पालकनीती संस्थेतर्फे सातत्यानं प्रशिक्षणं होत असतात. त्यामुळे मुलांबरोबर काम करणं सोपं होत आहे. मुलांच्या शैक्षणिक भेटी, सहली अशा उपक्रमांतून कातकरी मुलं आता हळूहळू समाजाशी जोडली जाऊ लागली आहेत. खेळघर - तायांनाही गावातच कामाची संधी मिळाली, त्यांच्या शिक्षणाचं चीज झालं. त्यांना गावात मान मिळतो आहे.

नुकतंच, जानेवारीमध्ये आम्ही कातकरी मुलांचं स्नेहसंमेलन घेतलं. आपापल्या कातकरी वस्तीतल्या अडचणी, त्यांना भेडसावणारे प्रश्न मुलांनी नाटकातून मांडले. अंधश्रद्धा, पाणीबचत, स्वच्छता, दारूबंदी, आरोग्य आणि मुली वाचवा मुली शिकवा असे विषय मुलांसोबत चर्चा करून ठरवले होते. कातकरी भाषेतली गाणीही बसवली. वीस दिवसात खेळघर तायांनी त्यांची भरपूर तयारी करून घेतली. यातली अनेक मुलं -मुली पहिल्यांदा स्टेजवर येऊन काहीतरी सादर करत होती, त्यांच्या दृष्टीनं तो फार महत्त्वाचा क्षण होता. संधी नाकारल्या गेलेल्या या मुला-मुलींचा आत्मविश्वास या संमेलनामुळे निश्चित वाढला आहे. आता नवीन कार्यक्रम काय घ्यायचे याबद्दल ते विचारणा करत आहेत. या सगळ्यात माझ्या लक्षात आलं की संधी मिळणं किती महत्त्वाचं आहे. अशा संधी माणसाला अधिक सक्षम करत जाते. आपली कातकरी मुलंही आता त्या मार्गावर चालत आहेत.

अर्थात अजूनही भरपूर कामं बाकी आहेत. कातकरी लोकांच्या जागेचे प्रश्न, जातीचा दाखला, जातपडताळणी प्रमाणपत्र, रेशनकार्ड यावर काम होणं फार गरजेचं आहे. त्यासाठी कातकऱ्यांना एकत्र आणण्याची गरज आहे आणि ती मोहीम आम्ही पुन्हा सुरू केली आहे.

# मुलांना समजून घ्यायला हवं !

**देविका गायकवाड**
आलोचना, पुणे

जानु म्हणजे जान्हवी. माझा मुलगा नील याची मैत्रीण. जानु आमच्या शेजारीच रहाते. ती दहा वर्षांची आहे. तिला अभ्यास करायला बिलकुल आवडत नाही. खरंतर आवडत नाही म्हणण्यापेक्षा शाळेत शिकवलेलं समजत नाही म्हणून अभ्यासाचा कंटाळा येतो. पण कुणी समजून घेणारं भेटलं, समजून सांगणारं भेटलं, तिनं केलेल्या गोष्टींचं कौतुक झालं तर ती सगळं काही आनंदानं करायला तयार होते अगदी अभ्यासही.

अभ्यासात मागं पडते या एका कारणानं जानु वेडी आहे, बावळट आहे, तिला काही समजतच नाही असा शिक्का मारायला तिचे पालक सदैव तयार असतात आणि मग ते ऐकून तिच्या मित्र–मैत्रिणी, खेळगडीही तिला तसंच म्हणतात.

खरंतर जानुला खूप प्रश्न पडतात आणि ती ते मला बिनधास्तपणे विचारतेही.

'इतर कुणालाही काही विचारलं तर ते मला वेडी म्हणतात आणि हे डोकं अभ्यासात चालवलं तर बरं होईल असं म्हणतात.' जानुचे हे शब्द मला कसनुसं बनवतात. मुलाला सर्वात जवळचे असणारे आई–वडिलच जेव्हा खूप सहजतेनं आपल्या मुलाला वेडं, बावळट, ढ म्हणतात, तेव्हा मुलांना त्याचं किती दुःख होतं, किती वाईट वाटतं आणि मनाला ते किती बोचतं हे मला पहिल्यांदा जानुकडून कळालं. एक दिवस जानुनं मला प्रश्न विचारला की अशी खूप मुलं असतील ना ज्यांना अभ्यास येत नाही? मी सांगितलं की हो अशी खूप मुलं असतात. ''मग मला माझे आईबाबा सारखं वेडीवेडी का म्हणतात?'' आणि असं म्हणून जानु खूप रडायला लागली. आपण जसे आहोत तसं आपल्याला स्वीकारलं जात नाही, समजून घेतलं जात नाही तेव्हा काय दुःख आणि घुसमट होते हे त्या दहा वर्षाच्या मुलीनं तिच्या भावनेतून दाखवून दिलं.

मला मात्र जानु नेहमीच खूप हुशार वाटत आलीये. तिची समज चांगली आहे. तिला खूप प्रश्न पडतात. ती आजूबाजूला घडणाऱ्या गोष्टींकडे पहात असते, त्याबद्दल विचार करत असते; याचं नेहमीच कौतुक वाटतं आलंय मला. नुकताच घडलेला हा प्रसंग पहा ना! अभ्यासाशी संबंध नसलेले प्रश्न म्हणून एरवी कुणी दखलही घेतली नसती याची. पण माझ्या दृष्टीनं ते प्रश्न खूप महत्त्वाचे होते. तिनं मला विचारलं, ''तुम्ही तुमच्या नवऱ्याला गणेश का म्हणता, वो (अहो) का म्हणत नाही? नवऱ्याला वो का म्हणायचं असतं?'' त्यानंतर सुरुवात झाली ती आमच्या संवादाला. माझ्यासाठी जानुला ह्या प्रश्नांची, तिला समजतील अशी उत्तरं देणं हे एक आव्हानच होतं. कारण तिच्या प्रश्नांची उत्तरं एका शब्दात, एका वाक्यात देता येण्यासारखी नव्हती. सगळ्या लहान मुला–मुलींना असे प्रश्न पडले आणि त्यांच्याशी योग्य संवाद साधणारं कुणी मिळालं तर किती बरं होईल ना, या विचारानं मला खूप बरं वाटलं. तिला समजवायला कुठून सुरुवात करायची हा प्रश्न असल्यामुळे मीच तिला विचारलं, ''तुला काय वाटतं ग जानु, का म्हणत असतील वो असं?''

''कारण ते आपल्यापेक्षा मोठे असतात.''

''पण मी आणि गणेश तर एकाच वयाचे आहोत. मग मी का त्याला वो म्हणायचं?''

''पण तरीही म्हणायचं असतं. कारण ते आपल्यावर ओरडतात, ते आंघोळीला गेल्यावर त्यांना टॉवेल द्यावा लागतो.''

''ते का बरं स्वतःच्या हातानं घेत नाहीत?'' पाठोपाठ हाही प्रश्न तिनं लगेचच विचारला. तिच्या बोलण्यातून हे जाणवत होतं की जानु तिच्या घरात जे रोज बघत होती आणि माझ्या घरात तिला जे दिसत होतं याबद्दल तिला प्रश्न पडत होते. आई–वडिलांच्या नात्यातली असमानता तिला जाणवत होती. लहान असल्यामुळे तिला शब्दात मांडता आलं नाही. पण दिसणारा हा भेदभाव तिला त्रास देतोय, असं का हे प्रश्न तिला पडताहेत. माझ्या लेखी तर जानु सगळ्यात हुशार मुलगी आहे. कारण ती विचार करते आणि तिला प्रश्न पडतात.

या प्रसंगानंतर जानु आणि माझ्यात एक छान संवाद सुरू झालाय; स्त्री–पुरुष असमानतेपासून इतर अनेक विषयांवरचा.

# वाचक लिहितात... 

आलोचनाच्या संवादिनी कार्यक्रमांतर्गत माझ्या गावातल्या शाळेत आम्ही मुलांसाठी कार्यक्रम घेतो. स्नेहलताई व प्राजक्ताताई दर महिन्याला शाळेतील मुलांसाठी खूप छान, रंगीत चित्रे असलेली पुस्तके घेऊन येतात व त्यांना छान गाणी- गोष्टी सांगतात आणि त्यांचे खेळही घेतात. त्यामुळे मुले त्यांची खूप वाट बघत असतात.

बालदिनानिमित्ताने गाणी, खेळ, गोष्टी, नाटुकले असा मस्त कार्यक्रम आम्ही घेतला होता. त्याबद्दलचा स्नेहलताईंचा लेख मागच्या चुलीपल्याडमध्ये प्रकाशित झाला होता. त्याबद्दलचा अनुभव मला सांगायचाय.

हा लेख बघून मला इतका आनंद झाला की मी, लगेचच तो शाळेत सर्व मुलांना वाचून दाखवला व बघायला दिला. आपल्याबद्दल पुस्तकात छापून आले आहे. आपल्या शाळेचा – आपला फोटो आलाय हे बघून मुलांचे चेहरे तर टपोऱ्या गुलाबासारखे फुलले. सर्वांनी आपल्या घरी, शेजारी-पाजारी सांगितले की, ''संस्थेच्या ताई आल्या होत्या नं; त्यांनी आमच्यावर लेख लिवलाय – आमचा फोटुबी आलाय'' मग काय! आख्खं गावच खुश झालं की, शाळेबद्दल, आपल्या मुलांबद्दल छापून आलंय, मुलांचे फोटो आलेत.

कार्यक्रमाच्या दिवशी सोनाली सर्वांसमोर पुढे येऊन बोलली. चुलीपल्याडमध्ये आलेला तिचा फोटो, तिचं नाव बघून तिच्या मम्मी-पप्पांनापण खूप आनंद झालाय, आपली मुलगीपण बाहेर काहीतरी करतेय..!

आणि हो! मुलांनी त्यांचे फोटो बघून... काहीतरी बनवले आहे. पण त्यांनी ते मलापण नाही दाखवले. पुण्याच्या ताई आल्या ना की, त्यांनाच दाखविणार म्हणताहेत! मग ताई, कधी येणार बघायला?!

**कोमल ढवळे**, दिशा, तळेगाव दाभाडे

---

दिशा व आलोचना संस्था यांचा 'संवादिनी' कार्यक्रमामुळे गेल्या चार-पाच वर्षांपासूनचा अनुबंध आहे. बचत, पैसे, कर्ज-वसुली हे आमचे दिशाचे नेहेमीचेच विषय. पण त्यापलीकडे जाऊन स्त्रियांना त्यांच्या आयुष्याचे भान आणून देऊन, अधिक चांगल्या परिस्थितीकडे जाण्यासाठी आलोचनातर्फे मिळणारी माहिती व विचार नेहमीच उद्बोधक आणि उपयोगी ठरतात.

जयश्रीताई गोटे या आमच्या बचतगटाच्या अध्यक्षा व विद्यमान ग्रामपंचायत सदस्यादेखील आहेत. माहिती व दृष्टिकोन घेऊन पुढे जाणाऱ्या सक्षम महिला आहेत. चुलीपल्याडच्या मागच्या अंकात त्यांची मुलाखत प्रसिध्द झाली होती.

एका प्रशिक्षण कार्यक्रमात आम्ही ही मुलाखत वाचून दाखविली व जयश्रीताईंचा सत्कार केला. तसेच जे बचतगट चांगले चालतात, ज्यांची वसुली चांगली आहे त्यांचा सत्कार आम्ही जयश्रीताईंच्या हस्ते केला. त्यावेळी बोलताना महिलांना त्या म्हणाल्या, ''मी जशी पुढे आले आणि मी जशी स्पष्ट सांगते. काही लपवत नाही. तसं तुम्हीपण मोकळेपणाने बोला आणि आपले प्रश्न मांडा.'' बचतगटाच्या चाळीस महिला या प्रशिक्षणात सहभागी झाल्या होत्या. बँकेचे अधिकारीही उपस्थित होते.

या कार्यक्रमात चुलीपल्याडचा हा अंक आम्ही सर्वांना दिला. महिला तो आवर्जून मागून घेत होत्या- म्हणजे एरवी कसे वस्तू-बिस्तू मागतात ना तसे. आम्हाला खूपच कौतुक वाटले याचे.

एकूणच हा अंक विचार करायला लावणारा आहे. आम्ही एरवीही आमचे जे १०० बचतगट आहेत, त्यांच्या मासिक बैठकीमध्ये चुलीपल्याडच्या अंकाचे वाचन करतो. तसेच महिला/ किशोरी / युवतींसाठी जे कार्यक्रम आयोजित करतो तेथेही कार्यक्रम सुरू होण्याआधी आलेल्या सर्वांना हा अंक वाचायला दिला जातो.

या सगळ्याचा परिणाम म्हणून की काय, आता बऱ्याच जणी महिला दिनाच्या शुभेच्छा देण्यासाठी आवर्जून फोन करतात.

**गीता फाटक**, दिशा, तळेगाव दाभाडे

# “काकू, तू का पेपर वाचतेस?”

“ए काकू ऽ तू का पेपर वाचतेस?”

माझा छोटा मित्र सलिल, वय वर्षे आठ, काहीतरी विचित्र पाहिल्यावर करावे तसे तोंड करून मला विचारत होता. त्याच्या मते, मी वागतही विचित्र होते. म्हणजे कोणत्याही आई, काकू, मावशी, आजी, आत्या यांनी करायचे नसते अशी गोष्ट मी करीत होते. काय? तर अहो, मी चक्क पेपर – वर्तमानपत्र घेऊन निवांतपणे मन लावून वाचत बसले होते !




मला त्याच्या प्रश्नाचे हसूही आले आणि वाईटही वाटले. म्हणजे एकतर घरातल्या बाईने सतत चुलीपाशी (म्हणजे गॅसपाशीच हो !... तेवढी तर प्रगती केलीच आहे आपण) राबताना दिसले पाहिजे आणि अगदीच बाई निवांत असेल तर तिने टि.व्ही.वरील बायकांना बिनडोक ठरविणाऱ्या सिरीयल्स तरी बघायला पाहिजेत. हे सगळे अलिखित नियम सलिलच्या मनात इतक्या लहान वयात किती खोलवर व ठामपणे रूजले जात आहेत! मी त्याला विचारले, “तुमच्याकडेपण पेपर येतो ना...” तेव्हा त्याची ताबडतोब प्रतिक्रिया होती, “हो, पप्पा वाचतात ना !”

वर्तमानपत्र आपल्याला सभोवताली घडणाऱ्या महत्त्वाच्या राजकीय, सामाजिक घटना, शासकीय निर्णय, इ. सर्व प्रकारच्या घडामोडींची माहिती करून देते. पण स्त्रियांना हे सगळे कळण्याची, समजून घेण्याची गरजच काय? हो, म्हणजे मान्य आहे की, स्त्रिया आता सुशिक्षितच नाहीत तर उच्चशिक्षितही होताहेत. पण याचा अर्थ त्यांनी जास्तीत जास्त फॅशन टीप्स, विविध पाककृती आणि हो, ‘उद्या पाणीपुरवठा बंद’ हे तर जरूरच वाचावे अशी सर्वसाधारण अपेक्षा. आठ वर्षांचा सलिलदेखील हीच अपेक्षा नव्हता का व्यक्त करत?

स्त्री–पुरुष असे साचेबध्द कप्प्यांमध्ये विभागले जाण्याचा हा छोटासा पण किरकोळ नसणारा अनुभव सुन्न करून गेला.

**प्राजक्ता उ. वि.** आलोचना, पुणे

**संपादक** : वंदना कुलकर्णी **संपादक साहाय्य :** प्राजक्ता उषा विनायक, अर्चना झेंडे, देविका गायकवाड, स्नेहल ठक्कर

**कार्यालयीन साहाय्य :** सुवर्णा जाधव, तनजिम खानजादे

**प्रकाशक** : आलोचना, ५, पंचाद्री सोसायटी, दुसरा मजला, अशोक पथ, लॉ कॉलेज रोड, पुणे ४११००४.
फोन : ०२०–२५४४४१२२

**मांडणी** : यदिश ग्राफिक्स, पुणे ३०. **मुद्रक :** मुद्रा, पुणे ३०

**संवादिनी प्रकल्पातील सहभागी संस्था :** साधना व्हिलेज, मावळ, पौड; दिशा, तळेगाव; रचना सामाजिक संस्था, पानशेत; वर्क फॉर इक्वॅलिटी, तळेगाव; ऊर्मी, हिंजेवडी; अक्षरा, मावळ, पौड; निर्माण बहुउद्देशिय संस्था, ग्रीनतारा, विश्रांतवाडी; बहुजन हिताय, दापोडी; क्विल्ट कल्चर, कोंढवा; स्त्रीवाणी, होप, वडगाव शेरी; क्रांतिज्योती, बॉस्को सामाजिक संस्था, येरवडा, पुणे; सावित्रीबाई फुले वाचनालय, धायरी.

फक्त खासगी वितरणासाठी; या अंकातील विचारांशी आलोचना सहमत असेलच असे नाही.